# सर्व फार्मसी पदविका (D.PHARM.) व पदवी (B.PHARM)
# उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सूचना

## <u>ऑनलाईन पंजीकरण अर्ज भरण्याची सहज व सोपी प्रक्रिया</u>

डी.फार्म. व बी.फार्म. उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, कृपया त्यांनी पंजीकरण अर्ज भरण्याकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रणाली चा वापर करावा कारण ती वापरायला अतिशय सोपी (User friendly) आहे.

१) अर्जदाराने स्वतचा मोबाईल क्र. व ईमेल आयडी वापरुन Login ID निर्माण करावयाचा आहे जे अतिशय सोपे आहे ( जसे नेट बँकिंग, ऑनलाईन व्यवहार अथवा ऑनलाईन रेल्वे बुकींग साठी आपण नेहमी करतो)

२) त्यानंतर स्क्रीन वर दिसणा-या रकान्यामध्ये स्वतःची माहिती भरायची आहे. जे करण्यास पाच मिनीटांपेक्षा अधिक कालावधी लागत नाही.

३) गुणपत्रिका व आवश्यक कागदपत्रे, फोटो, सही स्कॅन करुन ठेवावीत व माहिती भरल्यावर ती अपलोड करावी. त्यासाठीची कार्यपध्दती Guidelines मध्ये दिलेली आहे.

४) त्यानंतर Payment Gateway द्वारे फी भरावयाची आहे. आपल्याकडे असलेले डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड/पेटीएम कार्ड (ऑनलाईन खरेदी करताना आपण ज्याप्रकारे डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड द्वारे व्यवहार करतो) वापरुन फीचा भरणा करता येईल. जर यापैकी कोणताही पर्याय आपणाकडे नसेल तर आपण स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत MSPC Savings A/c मध्ये फी रक्कम भरु शकता. भरणा केल्यानंतर प्राप्त झालेली पावती जपून ठेवावी. त्याबाबतची माहिती सिस्टीममध्ये भरावी.

५) त्यानंतर मूळ कागपत्रे पडताळणीसाठी कार्यालय भेटीची तारीख (Appointment)आपणास सिस्टिम निवडण्याचा पर्याय देईल तो आपण निवडायचा.

....................२.

**६)	त्यानंतर आपल्या ऑनलाईन अर्जाची व सहपत्रांची कार्यालयामध्ये पडताळणी होऊन तो मान्य (Approve)झाल्यावर आपणास पंजीकरण क्रमांक प्राप्त झाल्याचा ईमेल व एसएमएस प्राप्त होईल. त्यानंतर पुन्हा Login करुन (यापूर्वी दिलेल्या Login ID व Password वापरुन) आपल्या अर्जाचे Approved Status बघायचे व Provision Certificate वर Click करुन त्याची आपण प्रिन्ट आऊट काढू शकता.**

**याद्वारे आपण आपल्या गावातूनच ही प्रक्रिया करुन पंजीकरण क्रमांक व प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळवू शकता जे आपणास नोकरी अथवा व्यवसायासाठी अर्ज करताना उपयोगी पडेल.**

७) कार्यालय भेटीसाठी (Appointment) दिलेल्या तारखेस कार्यालयात मूळ कागदपत्रे, ऑनलाईन अर्जाचे प्रिन्ट आऊट व फी भरल्याची पावती घेऊन यावयाचे आहे. कार्यालयात मूळ कागपत्रांची पडताळणी होऊन ती लगेच परत दिली जातील व त्यानंतर याबाबतची कार्यवाही पूर्ण होऊन मूळ पंजीकरण दाखला आपल्या पत्त्यावर पाठविण्यात येईल.

दिनांक :- ४.०८.२०१८ — निबंधक

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद